# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१८ – १९

## स्पर्धा परीक्षा विभाग

पुढारी | पुणे, शुक्रवार ३ ऑगस्ट २०१८



हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात बोलताना प्रा. शरद पाटील.

# चांगल्या भविष्यासाठी स्पर्धा परीक्षा उत्तम पर्याय

## प्रा. शरद पाटील

राजगुरुनगर : प्रतिनिधी

महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थ्यांकडे वेळ आणि ऊर्जा प्रचंड असते तिचा सकारात्मक उपयोग करून आपले भविष्य उज्ज्वल करण्यासाठी स्पर्धा परीक्षेचा उत्तम पर्याय स्वीकारावा, असे मत युनिक अ‍ॅकॅडमीचे प्रा. शरद पाटील यांनी व्यक्त केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी आयोजित स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळेत 'अभ्यास कसा करावा' या विषयावर पाटील बोलत होते. अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे पाटील होते. उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. जी. जी. गायकवाड, स्पर्धा विभाग प्रमुख प्रा. दिलीप मुळूक, सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थी या वेळी उपस्थित होते.

प्रा. पाटील म्हणाले, विद्यार्थ्यांनी अभ्यास साहित्य आणि योग्य नियोजन केल्यास ग्रामीण भागातूनही परीक्षेची उत्तम तयारी करता येऊ शकते. विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करून सक्षम अधिकारी होताना आपले स्वप्न पूर्ण करा असेही सांगितले.

प्रा. इंद्रजीत यादव यांनी स्पर्धा परीक्षेचे स्वरूप या विषयावर बोलताना पूर्व व मुख्य परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षा पध्दती, गुणपध्दती आदिबद्दल माहिती सांगितली. स्पर्धा परीक्षेचे क्षेत्र समाजाच्या सर्व स्तरावर असून विद्यार्थ्यांनी स्वतःला सिध्द करण्यासाठी स्पर्धा परीक्षा माध्यमाचा गांभीर्याने वापर करावा, असे सांगितले.

संस्था अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी इच्छा आणि कठोर परिश्रमाच्या बळावर उत्तम तयारी करून स्वतःला घडवू शकतो असे सांगितले. प्रा. दिलीप मुळूक यांनी प्रास्ताविक केले. डॉ. संजय शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी आभार मानले.

शनिवार,
४ ऑगस्ट २०१८

## राजगुरू महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन

राजगुरुनगर : 'युवकांनी आपल्या प्रचंड ऊर्जेचा सकारात्मक उपयोग करून, स्पर्धा परीक्षेद्वारे आपले भविष्य उज्ज्वल करावे,'' असे आवाहन पुण्याच्या युनिक अॅकॅडमीचे प्रा. शरद पाटील यांनी केले. येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात युनिक अॅकॅडमीतर्फे आयोजित स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळेत 'अभ्यास कसा करावा' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील होते. उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, उपप्राचार्य प्रा. जी. जी. गायकवाड, स्पर्धा विभाग प्रमुख प्रा. दिलीप मुळूक आदी उपस्थित होते. 'विद्यार्थ्यांनी स्वतःला सिद्ध करण्यासाठी स्पर्धा परीक्षा माध्यमाचा गांभीर्याने वापर करावा,' असे प्रा. इंद्रजित यादव यांनी सांगितले. युनिक अॅकॅडमी व हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातर्फे सुरू करण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षा केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. आभार प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी मानले.

**केसरी** पुणे, ५ ऑगस्ट २०१८

## चांगल्या भविष्यासाठी स्पर्धा परीक्षा उत्तम पर्याय

### प्रा. शरद पाटील यांचे प्रतिपादन



राजगुरुनगर, (वार्ताहर): महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थ्यांकडे वेळ आणि उर्जा प्रचंड असते. तिचा सकारात्मक उपयोग करुन आपले भविष्य उज्ज्वल करण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेचा उत्तम पर्याय स्वीकारावा असे प्रतिपादन पुण्याच्या युनिक अॅकॅडमीचे प्रा. शरद पाटील यांनी केले.

हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात युनिक अॅकॅडमीच्या वतीने आयोजित स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळेत 'अभ्यास कसा करावा' या विषयावर ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील होते. या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. एस.बी. पाटील, उपप्राचार्य डॉ.एच.एम.जरे, डॉ. व्ही.डी.कुलकर्णी, डॉ.संजय शिंदे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. जी. जी. गायकवाड, स्पर्धा विभाग प्रमुख प्रा. दिलीप मुळूक, सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

प्रा. शरद पाटील यांनी पुढे बोलताना विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेसाठी लागणारे अभ्यास साहित्य आणि योग्य नियोजन केल्यास ग्रामीण भागात राहूनही या परीक्षेची उत्तम तयारी करता येऊ शकते असे सांगितले. विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करून सक्षम अधिकारी होताना आपले स्वप्न पूर्ण करा असेही त्यांनी सांगितले. प्रा. इंद्रजीत यादव यांनी स्पर्धा परीक्षेचे स्वरुप या विषयावर बोलताना पूर्व व मुख्य परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षा पध्दती, गुणपध्दती आदिंबद्दल माहिती सांगितली.

या वेळी युनिक अॅकॅडमी व हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षा केंद्राचे उदघाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. दिलीप मुळूक यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. संजय शिंदे यांनी तर आभार प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी मानले.

जनप्रवास

सोमवार, दि. ६ ऑगस्ट २०१८


# चांगल्या भविष्यासाठी स्पर्धा परीक्षा उत्तम पर्याय : प्रा. शरद पाटील

राजगुरुनगर । वार्ताहर

महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थ्यांकडे वेळ आणि ऊर्जा प्रचंड असते. तिचा सकारात्मक उपयोग करून आपले भविष्य उज्ज्वल करण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेचा उत्तम पर्याय स्वीकारावा असे आवाहन पुण्याच्या युनिक अॅकॅडमीचे प्रा. शरद पाटील यांनी केले.



हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात युनिक अॅकॅडमीच्या वतीने आयोजित स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळेत 'अभ्यास कसा करावा' या विषयावर ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील होते. या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. एस.बी.पाटील, उपप्राचार्य डॉ.एच.एम.जरे, डॉ. व्ही.डी.कुलकर्णी, डॉ.संजय शिंदे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा.टी.बी.गायकवाड, स्पर्धा विभाग प्रमुख प्रा. दिलीप मुळूक, सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

प्रा. शरद पाटील यांनी पुढे बोलताना विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेसाठी लागणारे अभ्यास साहित्य आणि योग्य नियोजन केल्यास ग्रामीण भागात राहूनही या परीक्षेची उत्तम तयारी करता येऊ शकते असे सांगितले. विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करून सक्षम अधिकारी होऊन आपले स्वप्न पूर्ण करा असेही त्यांनी सांगितले.

प्रा. इंद्रजीत यादव यांनी स्पर्धा परीक्षेचे स्वरूप या विषयावर बोलताना पूर्व व मुख्य परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षा पद्धती, गुणपद्धती अशी विस्तृत माहिती सांगितली. स्पर्धा परीक्षेचे क्षेत्र समाजाच्या सर्व स्तरावर असून विद्यार्थ्यांनी स्वतःला सिद्ध करण्यासाठी स्पर्धा परीक्षा माध्यमाचा गांभीर्याने वापर करावा असे सांगितले.

संस्था अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी विद्यार्थ्यांना स्वतःची इच्छा आणि कठोर परिश्रमाच्या बळावर उत्तम तयारी करून अंतिमतः आपण स्वतःला घडवू शकतो असे सांगितले. माणसाची परिस्थिती कशीही असली तरी इच्छाशक्तीच्या पंखांनी आकाश पादाक्रांत करता येऊ शकते असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या वेळी युनिक अॅकॅडमी व हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षा केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. दिलीप मुळूक यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. संजय शिंदे यांनी तर आभार प्रा. मच्छिंद्र मुळूक यांनी मानले.

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख